# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.८

सभावृत्तांत

दिनांक १८/१०/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक १८/१०/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ३. | मा. श्री. थोपटे कैलासभाऊ गबाजी | सदस्य |
| ४. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. मिनीनाथ दंडवते, क्षेत्रीय अधिकारी, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. एस.टी. आव्हाळे, लेखाधिकारी, मा.नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. शिरीष पोरेडी, मा. विनय ओहोळ, मा. एल. बी. जाधव, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. व्ही.एस. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा. अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. वाकोडे ए.एस.,कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. पाडवी व्ही.ए., मा. भालेराव यु.ए., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. संदीप कोतवडेकर, मा. आर.एम. सौदाई, मा. अतुल सोनवणे, मा. एस.ए. पाटील, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक,मा. बैचे, मोरे सी.सी. हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. सुनिल दुदुसकर, उद्यान सहाय्यक, मा.सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत येत आहे. तदनंतर मा. कैलासभाऊ थोपटे, सदस्य ड प्रभाग समिती सभेस आवश्यक गणपूर्ती नसल्याने आजची बैठक तहकुब करण्यात यावी.

मा. राजेंद्र गणपतराव जगताप यांनी सदर सूचनेस अनुमोदन दिले.

मा. सभापती : मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनेस अनुसरुन माहे ऑक्टोबर २०१६ ची मासिक सभा गणपूर्ती अभावी दि. ४/११/२०१६ रोजी सकाळी ११.४५ वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. तसेच बैठकीस उपस्थित सर्व अधिका-यांचे आभार मानुन आजची बैठक संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,
रहाटणी - १७

सही/-
( सीताराम बहुरे )
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२८५/२०१६
दिनांक – १८ /१०/२०१६

## **पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७**

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.८

सभावृत्तांत

दिनांक ०४/११/२०१६ सकाळी ११.४५ वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१६ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०४/११/२०१६ रोजी सकाळी ११.४५ वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| ५. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| ६. | मा. निता विलास पाडाळे | सदस्या |
| ७. | मा. अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| ८. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. सुनिल पाटील, मा. एल. बी. जाधव, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. व्ही.एस. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा.एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. वाकोडे ए.एस., मा. बी.एम. मुलाणी, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.संजय चव्हाण, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. भालेराव यु.ए., मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. आनंद नायडू, कनिष्ठ अभियंता, झोनिपू, मा. मोरमारे एस.व्ही., कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. शिनगारे मंगेश, उपलेखापाल, मा. संदीप कोतवडेकर, मा. आर.एम. सौदाई, मा. अतुल सोनवणे, मा. सरोदे व्ही. एस. आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक,मा.जी.एन. खैरे, उद्यान सहाय्यक, मा.सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत येत आहे. तदनंतर मा.राजेंद्र गणपतराव जगताप, सदस्य यांनी आजच्या ड प्रभाग समिती सभेस आवश्यक गणपूर्ती नसल्याने आजची बैठक तहकुब करण्यात यावी अशी सूचना केली.

मा. निता विलास पाडाळे यांनी सदर सूचनेस अनुमोदन दिले.

मा. सभापती : मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनेस अनुसरुन माहे ऑक्टोबर २०१६ ची मासिक सभा गणपूर्ती अभावी दि. २/१२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. तसेच बैठकीस उपस्थित सर्व अधिका-यांचे आभार मानुन आजची बैठक संपल्याचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,

रहाटणी - १७

सही/-

( सीताराम बहुरे )

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२९०/२०१६

दिनांक – ०४/११/२०१६

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.८

सभावृत्तांत

दिनांक ०२/१२/२०१६ सकाळी ११.३० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑक्टोबर २०१६ ची तहकुब मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/१२/२०१६ रोजी सकाळी ११.३० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या “छत्रपती शाहू महाराज सभागृह” येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. श्री. वाघेरे प्रभाकर नामदेव | सदस्य |
| ३. | मा. निता विलास पाडाळे | सदस्या |
| ४. | मा. आरती सुरेश चोंधे | सदस्या |
| ५. | मा. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ६. | मा. वैशाली राहुल जवळकर | सदस्या |
| ७. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

याशिवाय खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. शिवाजी तुकाराम पाडुळे

२. मा. धनंजय गणपत मोहिते

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. अशोक बोनगीर, लेखाधिकारी, मा. डी.एन. गायकवाड, उद्यान अधिक्षक, उद्यान , मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. सुनिल पाटील, मा. एल. बी. जाधव, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. रवींद्र पवार, उपअभियंता, जलनि:सारण, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू स्थापत्य, मा. नितीन देशमुख, उपअभियंता, विद्युत, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, मा. व्ही.एस. गेंगजे, क्रीडा निरीक्षक, मा.अजय जाधव, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. व्ही.पी. गजपुरे, मा. आय.के. कलाल, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. वाकोडे ए.एस.कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा.संजय चव्हाण, मा. राजेंद्र जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. व्ही.ए. पाडवी, मा. भालेराव यु.ए., मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. कुंभार सी.एम. कनिष्ठ अभियंता, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, मा. संदीप कोतवडेकर, मा. आर.एम. सौदाई, मा. अतुल

सोनवणे, मा. सरोदे व्ही. एस., मा. सतीश पाटील, आरोग्य निरीक्षक, मा. अमर मद्रासी, मलेरिया निरीक्षक,मा.सुनिल दुदुसकर, मा. दिलीप सटाले, उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ७ माहे सप्टेंबर २०१६ ची मासिक सभा दिनांक ०२/०९/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ७ माहे सप्टेंबर २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे ऑक्टोबर २०१६ च्या कार्यपत्रिका क्र. ८ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र.२२

दिनांक :२/१२/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सुचक : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील) अनुमोदक :मा. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा. उषा संजोग वाघेरे (पाटील) यांचेकडील दि. १४/०९/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मध्ये भैरवनाथ मंदीरामागे मनपाची सार्वजनिक मुतारी असुन त्या मुतारीची व्यवस्थित देखभाल व दुरुस्ती होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असल्यामुळे नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हानीकारक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच परिसरातील नागरीकांचे स्वत:चे घरगुती वापराकरीता शौचालयाची व्यवस्था असल्याने सदर सार्वजनिक मुतारी पाडणेबाबत तेथील नागरीकांच्या वारंवार तक्रारी येत असल्याने सदरचे शौचालय मुतारी पाडुन टाकणेबाबतचे करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

-----------------

विषय क्र. २ ठराव क्र. २३

दिनांक :२/१२/२०१६ विभाग: प्रशासन विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्ताव क्र. डक्षे/०७/कावि/५१९/१६ दि. ३०/०९/२०१६

केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्प्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४४ अशोक थिएटर, प्रभाग क्र.४७ नढेनगर काळेवाडी, प्रभाग क्र. ४८ तापकीरनगर,व प्रभाग क्र. ५६ वैदुवस्ती हे चार प्रभाग हगणदारी मुक्त झाले असुन तेथे वैयक्तिक शौचालये

बांधणेची कार्यवाही झाली असुन मनपा शाळा व बचतगटाचे प्रमाणपत्र प्राप्त असुन आरोग्य विभागाचे कार्यवाहीनुसार सदर चार प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free)घोषीत करणेबाबतच्या मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

----------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

<u>**मा. सभापती**</u> :- सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन, सर्व सन्मा. नगरसदस्य व अधिकारी वर्ग यांचे आभार मानुन माहे ऑक्टोबर २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,
रहाटणी - १७

सही/-
( सीताराम बहुरे )
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२९५/२०१६
दिनांक –२/१२/२०१६